RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक २७] सोमवार, ऑगस्ट १०, २०२६/श्रावण १९, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ६३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२.—महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.	**पृष्ठे** १-२

दिनांक ३ ऑगस्ट, २०२६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सुप्रिया धावरे,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ चा २०२२ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— महा. ३५.

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम १९ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १९ मध्ये, पोट-कलम (४) मधील खंड (च) मध्ये, "महाराष्ट्र विद्यापीठे लेखा संहितेनुसार" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेनुसार" हा मजकूर दाखल करण्यात येईल. २०२२ चा महा. ३५.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४३ मध्ये, पोट-कलम (ढ) मधील, "कलम ६० च्या पोट-कलम (६)" या मजकुराऐवजी, "कलम ६० च्या पोट-कलम (६) व (७)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ मध्ये, पोट-कलम (९) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(१०) पूर्वगामी पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, विद्यापीठावर बंधनकारक असतील असे, एकरूप परिनियम विहित करण्याचा अधिकार असेल.".

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५६ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ मध्ये, खंड (चार) मधील, "खरेदी व विक्री समिती" या मजकुराऐवजी, "खरेदी समिती" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५९ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ५९ मध्ये, पोट-कलम (५) मधील, खंड (ङ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(ङ) विद्यापीठाच्या कामांसाठी अनुभव सिद्ध व गुणवत्ता असलेले तीन ते पाच वास्तुविशारद आणि इतर विशेषीकृत सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, संरचना सल्लागार, कार्यकारी अभिकरणे यांची एक नामिका तयार करील आणि त्यास नियमक मंडळाकडून मान्यता घेईल;".

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ६० ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ६० मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईलः-

"(१) विद्यापीठाच्या सर्व खरेदींशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी हाताळण्यासाठी एक खरेदी समिती असेल;".

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ७६ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ७६ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "लेखा संहितेचे" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेचे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.